प्रेस नोट दिनांक :- २०/०८/२०२६

**नजर काढण्याच्या बहाण्याने घरात घुसुन बळीत महिलेच्या इच्छेविरूध्द अश्लील कृत्य करून लैंगिक अत्याचार करणा-या तृतीयपंथी (बहुरूपी) इसमावर गुन्हा दाखल करून ०४ तासात पवई पोलीस ठाणे मार्फत गुन्हा उघडकिस आणलेबाबत.**

दिनांक १८/०८/२०२६ रोजी दुपारी १२:२० वाजताचे सुमारास तक्रारदार **XYZ** हया त्यांच्या राहते घरी असताना ‘‘**अनिल** ’’ नावाच्या तृतीय पंथी व्यक्तीने त्यांची **नजर काढण्याच्या बहाण्याने** त्यांच्या घरात येवुन त्यांच्या बेडरूम मध्ये जावुन त्यांच्याशी जवळीक साधून त्यांना त्यांचे बरे-वाईट करण्याची भिती घालुन लैंगिक अत्याचार केल्याने तृतीय पंथी (बहुरूपी) इसमाविरूध्द पवई पोलीस ठाणे येथे दि. १८/०८/२०२६ रोजी गु.र.क्र. ८९०/२०२६ कलम ६४(१),३५१(२) भा. न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील पाहिजे आरोपीचा शोध घेतला असता सदरचा साडी परिधान केलेला तृतीय पंथी हा एका रिक्षातून निघून गेल्याचे दिसून आले. सदर बाबत तांत्रीक व मानवी कौशल्याचा वापर करून नमुद तृतीय पंथी इसम हा कळवा येथील झोपडपट्‌टी मध्ये रहात असल्याबाबत माहिती प्राप्त झाली. त्या माहितीच्या आधारे त्यास सदर ठिकाणाहून शिताफिने ताब्यात घेवुन अटक करून महिलांच्या लैंगिक अत्याचाराचा गंभिर गुन्हा तात्काळ ०४ तासात उघड करण्यात आला. सदरचा आरोपी हा तृतीयपंथी नसून भीक मागणारा बहुरूपी असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. नमुद आरोपी यांस दिनांक १९/०८/२०२६ रोजी अटक करण्यात आली असुन मा. न्यायालयासमक्ष हजर करण्यात आले आहे.
अटक आरोपी नामे :- अनिल शेषराव शिंदे वय २८ वर्षे, धंदा - भिक्षा मागणे (बहुरूपी ) रा.ठी. गोलाई नगर , गोलाई देवी मंदीर पाठिमागे, खारेगाव, कळवा, ठाणे,

सदरची कामगिरी मा.श्री. देवेन भारती पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा.श्री. मनोजकुमार शर्मा पोलीस सह आयुक्त (का व सु) बृहन्मुंबई, मा.श्री. अभिनव देशमुख अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, मा.श्री. दत्ता नलावडे पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ - ३, मा.श्री. दादासाहेब घुटुकडे सहाय्यक पोलीस आयुक्त, साकिनाका विभाग व मा.श्री. आत्माजी सावंत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पवई पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सुशांत बडगर पोलीस निरीक्षक (गुन्हे), संदीप पाटील, पोलीस उप निरीक्षक (तपासी अधिकारी) तसेच मपोउनि देशमुख, पोउनि पिंजरकर , व पो.ह.टिळेकर, पो.ह. झेंडे, पो. ह. नलावडे, पो. शि.शेट्टी, पो. शि.शिंदे यांनी पार पाडली आहे.

टिप:- मुंबई पोलीसांकडुन नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारच्या घटना भविष्यात घडू नये या करीता नागरिकांनी सतर्क राहून अनोळखी व्यक्ती, किंवा भिक्षा मागणारे (बहुरूपी ) यांना घरात प्रवेश देवु नये, तसेच काही संशयीत वाटल्यास तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षास १००/११२ या क्रमांकावर संपर्क साधावा.